पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई ■ वर्ष १ ■ अंक ४२ ■ बुधवार दि. १५ जुलै २०२६ ■ मूल्य ३ रुपये ■ पृष्ठे ४

■ RNI No.- MHAR/26/A4530 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




## » थोडक्यात

### ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने भीषण अपघात; चार ठार!

**नाशिक :** नाशिक पेठ महामार्गावर असलेल्या सावळघाट येथे काल मंगळवारी रोजी सायंकाळच्या सुमारास झालेल्या विचित्र अपघातात चार जणांचा मृत्यू झाला असून, एकजण गंभीर जखमी झाले आहेत. मागून येणाऱ्या ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने त्याने समोरील इको कारवर जबर धडक दिली. त्यामुळे ही कार पुढे असलेल्या ट्रक आणि मागून धडकलेल्या ट्रक यांच्यामध्ये दाबली गेली. यामुळे इको कारमध्ये बसलेल्या चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. मारुती ओमनी इको क्र. जीजे १५ सीआर ५६५९ तर ट्रक क्र. एमएच ०४ जीएफ ८९०१ असा आहे.

.............

### भीषण अपघात चौघांचा मृत्यू दोन जखमी

**मुंबई -** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर अलीकडे अपघातांचं प्रमाण काहीसं कमी झालं असलं तरी आज बुधवारी रोजी पुन्हा एकदा भीषण अपघात झाला आहे. महामार्गावर उभे करण्यात येत असलेल्या मोठी मालवाहू कंटेनर यांच्यामुळेच हे भीषण अपघात घडत आहेत. या अपघातात तब्बल चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. त्या सगळ्यांना लांजा रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. अपघातात दोन महिला आणि दोन पुरुषासह एकूण चार जणांचा मृत्यू झाला आहे. धडकेची तीव्रता इतकी भीषण की कारचा अक्षरशः चुराडा झाला.

...........

### टीईटी पेपरफुटी प्रकरण; मुख्य सुत्रधाराला 70 हजार रुपये!

**ठाणे :** शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटीच्या प्रकरणात, फुटलेला पेपर तब्बल पाच हजार परीक्षार्थींना विकण्याचा आरोपींचा कट होता, अशी धक्कादायक माहिती तपासात पुढे आली आहे. विशेष म्हणजे, हा पेपर पुढे कितीही चढ्या किंमतीने विकला गेला, तरी प्रत्येक पेपरच्या विक्रीमागे ७० हजार रुपये या रॅकेटमधील मुख्य सूत्रधार बिजेंद्रकुमार गुप्ता; याला हवे होते, अशी माहिती ठाणे पोलिसांच्या एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.

# 20 हजार ऑटो चालकांवर बेरोजगारीचे संकट !

## अकोल्यात धावणार 'इलेक्ट्रिक सिटी बस'

प्रतिनिधी १५ जुलै


**अकोला :** शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला आधुनिक रूप देण्यासाठी महापाकिा अकोल्यात लवकरच पर्यावरणपूरक 'इलेक्ट्रिक सिटी बस' सेवा सुरू होणार आहे. येत्या १५ ऑगस्टपासून ही सेवा प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असल्यामुळे अकोलेकरांना दिलासा मिळणार असला, तरी दुसरीकडे मात्र शहरातील जवळपास २० ते २५ हजार ऑटो चालकांसमोर उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सिटी बसच्या आगमनाने हजारो ऑटो चालक बेरोजगारीच्या उंबरठ्यावर उभे ठाकले आहेत. मोठा आर्थिक फटका ऑटो व्यावसायिकांना बसणार आहे. बदलत्या काळानुसार आणि अकोल्याच्या विकासासाठी 'इलेक्ट्रिक सिटी बस' ही शहराची अत्यंत महत्त्वाची गरज आणि सोय असली, तरी या



सुविधेमुळे शहरातील २० हजार कुटुंबांचा हक्काचा रोजगार डबघाईस येणार आहे. त्यामुळे या गरीब ऑटो चालकांसाठी प्रशासन काही पर्यायी मार्ग काढणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

१५ ऑगस्टपासून ४२ बसेस रस्त्यावर धावणार

अकोल्यातील वाढते प्रदूषण लक्षात घेता प्रशासनाने पर्यावरणपूरक वाहतुकीवर भर दिला आहे. १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या या सेवेत एकूण ४२ इलेक्ट्रिक बसेस धावणार आहेत. यामध्ये ९ मीटर लांबीच्या २८ बसेस आणि १२ मीटर लांबीच्या १४ बसेसचा समावेश आहे. या बसेसमुळे शहरातील प्रदूषण तर कमी होईलच, शिवाय प्रवाशांना सुरक्षित, स्वस्त आणि आरामदायी प्रवास करता येईल. दहा ते वीस रुपयात अकोल्यात एका ठिकाणाहून दूसऱ्या ठिकाणी प्रवास करता येणार आहे.




### काही ऑटो चालकांची मस्ती अंगलट येणार !

शहरात सिटी बस येण्यामागे आणि प्रवाशांनी तिला पसंती देण्यामागे ऑटो चालकांची वर्तणूकही तेवढीच कारणीभूत ठरत आहे. छोट्या शहरात भर रस्त्यात कुठेही कट मारणे, प्रवासी दिसताच वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून कुठेही ऑटो अचानक थांबवणे. कर्णकर्कश 'प्रेशर हॉर्न' वाजवून अकोलेकरांना मनस्ताप देणे अकोल्याचे डोकेदूखी, मायग्रेन सारखे आजार या प्रेशर हॉर्नमुळे सुरु झाले आहेत. काही ऑटो चालकांची प्रवाशांसोबत असलेली अरेरावी आणि दादागिरी, रेल्वे स्टेशनवर महिला प्रवाशांवर शेरेबाजी या सर्व मनमानी कारभारामुळे अकोलेकर नागरिक कमालीचे वैतागले आहेत. या पार्श्वभूमीवर, सुरक्षित आणि शिस्तबद्ध प्रवासासाठी नागरिक नक्कीच सिटी बसला प्राधान्य देतील, हे उघड आहे.

### कर्जबाजारी ऑटो चालकांसमोर संकट

गेल्या काही वर्षांत अकोल्यात नवीन ऑटो खरेदीचे प्रमाण लक्षणीय राहिले आहे. आरटीओच्या आकडेवारीनुसार यात मोठा बदल दिसत आहे. सन २०२३ मध्ये २३१,सन २०२४ मध्ये ७६०,सन २०२५ मध्ये ९५२ आणि चालू वर्ष २०२६ मध्ये आतापर्यंत ३०० नवीन थ्री-व्हीलर पॅसेंजर ऑटो विकत घेतले गेले आहेत. जिल्ह्यात सध्या सुमारे २६० ई-ऑटो आणि खाजगी वापराचे १,२०० ऑटो आहेत. नोंदणीकृत ७,५७३ पॅसेंजर ऑटो आणि इतर जिल्ह्यांतून येणारे ऑटो मिळून जवळपास २० ते २५ हजार ऑटो रोज शहरात धावत आहेत. यातील बहुतांश ऑटो हे बँक किंवा खाजगी फायनान्स कंपन्यांकडून कर्ज (लोन) घेऊन खरेदी करण्यात आले आहेत.

### कर्ज देणाऱ्या बँकांचे काय होणार

आता सिटी बस सुरू झाल्यावर प्रवाशांचा ओढा तिकडे वाढेल. परिणामी, ऑटो चालकांचे उत्पन्न बुडणार असून बँकांचे हप्ते कसे फेडायचे, हा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे. यामुळे केवळ ऑटो चालकच नाही, तर कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थांची वसुलीही धोक्यात येण्याची शक्यता आहे.

### शहरात धावणाऱ्या ग्रामिण ऑटोंचे काय?

# अकोला शहरात अनेक ठिकाणी दूषित पाणीपुरवठा

## अनेकांना पोटाचे विकार, मनपाचे दुर्लक्ष


प्रतिनिधी १५ जुलै

**अकोला:** अकोला शहरात प्रदूषित पाणी पुरवठा होत असल्याची नागरिकांची ओरड आहे. या प्रदूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दूषित पाणी पुरवठ्याने अनेकांना पोटाचे विकार वाढले असून लहान मुले वृध्दांना याचा सर्वाधिक त्रास आहे.

अकोला शहरातून एक अत्यंत चिंताजनक आणि नागरिकांच्या आरोग्याशी जोडलेली बातमी समोर येत आहे. अकोला शहरात गेल्या काही दिवसांपासून अनेक भागांत प्रचंड दूषित आणि प्रदूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याची तक्रार नागरिक करत आहेत. या दूषित पाण्यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, अनेकांना पोटाच्या विकारांनी ग्रासले आहे.

महापालिकेच्या जलप्रदाय विभागाचे या गंभीर समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र असून, आता तरी अधिकाऱ्यांनी जागे होऊन यावर तात्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अकोला महानगरपालिका नागरिकांना शुद्ध पाणी पुरवण्यात पूर्णपणे अपयशी ठरत असल्याचा आरोप आता नागरिक करू लागले आहेत.

शहरातील अनेक प्रभागांमध्ये नळांना येणारे पाणी हे गढूळ, दुर्गंधीयुक्त आणि रासायनिक दृष्ट्या प्रदूषित असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. हे पाणी




प्यायल्यामुळे अकोलेकरांचे आरोग्य धोक्यात आले असून, शहरातील खाजगी आणि शासकीय रुग्णालयांमध्ये पोटाचे विकार, गॅस्ट्रो, आणि उलट्या-जुलाबाच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

## केंद्रीय विद्यालयाची प्रवेश प्रक्रिया सुरु

**अकोला:** अकोल्यात नव्याने सुरू होत असलेल्या केंद्रीय विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पहिली ते पाचवीच्या प्रवेश प्रक्रियेला आज पासून सुरुवात झाली. विशेष म्हणजे ही संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने पार पडणार असून, यामध्ये एकूण २०० जागा उपलब्ध असणार आहेत. केंद्र सरकारच्या दर्जेदार शिक्षण प्रणालीचा लाभ आता अकोल्यातील विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी पहिली ते पाचवीसाठी प्रत्येकी एक तुकडी सुरू केली जात असून, प्रत्येक वर्गाची क्षमता ४० विद्यार्थी इतकी असेल.

# आमच्याकडे कोणतीही डील आलेली नाही !

प्रतिनिधी १५ जुलै

**मुंबई :** आगामी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारकडून संसदेत मांडल्या जाणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पाठिंबा देणार असल्याच्या सर्व चर्चा निराधार आहेत. आमच्याकडे या विधेयकासंदर्भात कोणतीही नवीन डिल आलेली नाही. तसा प्रस्ताव आल्यास आम्ही त्यावर अभ्यास करुन २४ तासांमध्ये भूमिका मांडू, अशी स्पष्टोक्ती खासदार सुप्रिया सुळे यांनी



दिली. त्या बुधवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या. आज सकाळपासून शरद पवारांची राष्ट्रवादी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारची साथ देत मतदारसंघ पुनर्रचना घटनादुरुस्ती विधेयकाला पाठिंबा देणार असल्याची जोरदार चर्चा रंगली होती.

# तिकीट बुकिंगमधील 'कॅप्चा कोड'ची कटकट मिटणार!

## रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा | आयआरसीटीसी संकेतस्थळात महत्त्वाचे बदल

प्रतिनिधी १५ जुलै

**पुणे :** रेल्वे तिकिटाचे ऑनलाईन आरक्षण करताना येणारे अनावश्यक पॉपअप्स, वारंवार भरावा लागणारा कॅप्चा आणि तिकिट बुक होण्यासाठी लागणारा प्रदीर्घ वेळ यामुळे त्रस्त झालेल्या प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. प्रवाशांचा हा त्रास कायमचा दूर करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने आयआरसीटीसीच्या तिकिट बुकिंग सुविधेत आमूलाग्र बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. तिकीट बुकिंगची प्रक्रिया अधिक सोपी, वेगवान आणि सुरक्षित करण्यासाठी आयआरसीटीसीच्या संकेतस्थळाची एक सुधारित 'बीटा आवृत्ती' तयार करण्यात आली असून, ती लवकरच प्रवाशांच्या सेवेत येणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

काही दिवसांपूर्वी जयपूर येथील 'मालवीय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'च्या विद्यार्थ्यांनी आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावरील अनेक गंभीर त्रुटी रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. यानंतर रेल्वेने तातडीने पावले उचलत १५ जुलैपर्यंत या संकेतस्थळात सुधारणा करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार, आयआरसीटीसी आणि रेल्वे सूचना प्रणाली केंद्राच्या अधिकाऱ्यांनी जयपूरमध्ये या विद्यार्थ्यांसमोर नवीन संकेतस्थळाची बीटा आवृत्ती सादर केली असून त्यावर विद्यार्थ्यांचे अभिप्राय मागवले आहेत.




### अत्याधुनिक संकेतस्थळाचे आज अनावरण

» प्रवाशांना रेल्वे तिकिटाचे आरक्षण करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी 'इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन' (आयआरसीटीसी) १५ जुलै रोजी आपल्या नवीन आणि अत्याधुनिक संकेतस्थळाचे अनावरण करणार आहे. नव्या वेबसाईटमुळे प्रवाशांना जलद गतीने तिकीट बुक करता येईल, बुकिंगची क्षमता वाढेल आणि विशेषतः 'तत्काळ' बुकिंग दरम्यान होणारा मनस्ताप कायमचा दूर होईल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.

### असे असणार नव्या संकेतस्थळातील बदल

» कॅप्चा आणि पॉपअप्स हद्दपार, जागांची उपलब्धता एकाच स्क्रीनवर, फास्ट बुकिंग सुविधा, एकदाच भरावी लागणार माहिती.

### आरक्षण यंत्रणेतही होणार बदल

» आयआरसीटीसीचे हे नवीन संकेतस्थळ रेल्वेच्या जवळपास ४० वर्षे जुन्या 'पॅसेंजर रिझर्व्हेशन इंजिन' या प्रणालीशी जोडण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. ही जुनी आरक्षण यंत्रणा देखील समांतर पद्धतीने पूर्णपणे अपडेट केली जात आहे. त्यामुळे संपूर्ण क्षमतेने काम करणारे हे नवीन आयआरसीटीसी पोर्टल पुढील काही महिन्यांत अधिकृतपणे लॉंच केले जाईल, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### ॲपने ४ कोटी डाउनलोडचा टप्पा केला पार

» रेल्वेच्या अधिकृत 'रेलवन' या ॲपने ४ कोटी डाउनलोड्सचा टप्पा पार केला असून, ते देशातील सर्वात मोठे रेल्वे तिकीट बुकिंग ॲप बनले आहे. या ॲपवर तत्काळ बुकिंगच्या वेळी होणारा 'बॉट्स'चा बेकायदेशीर वापर रोखण्यासाठीही रेल्वे विशेष सुरक्षा यंत्रणा राबवत आहे. हे सर्व महत्त्वाचे बदल मालवीय नॅशनल इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूर्ण सूचनांमुळेच शक्य झाल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी आवर्जून नमूद केले.

# एकनाथ शिंदे रात्री दिल्लीत अमित शाहांसोबत बैठक!

## दोन मंत्रिपदांची चिन्हं, महाराष्ट्राबाबत महत्त्वाची चर्चा

प्रतिनिधी १५ जुलै

**मुंबई :** केंद्रीय मंत्रिमंडळातील बहुचर्चित फेरबदलाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंगळवारी रात्री उशिरा नवी दिल्लीत दाखल झाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची त्यांनी भेट घेऊन चर्चा केली. यावेळी 'शिवसेना उबाठा'मधून फुटून शिवसेनेत आलेले सहा खासदारही शिंदे यांच्यासोबत होते. शिवसेनेला या विस्तारात एक कॅबिनेट मंत्रिपद आणि एक राज्यमंत्रिपद मिळण्याची शक्यता वर्तवली जात असून कॅबिनेटमध्ये खासदार श्रीकांत शिंदे, तर राज्यमंत्रिपदी ओमराजे निंबाळकर आणि संजय जाधव यांची नावे चर्चेत आहेत.

लोकसभेत संख्याबळ वाढलेल्या शिवसेनेला या विस्तारात एक कॅबिनेट मंत्रिपद आणि एक राज्यमंत्रिपद मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संसदेचे अधिवेशन सोमवारपासून सुरू होणार असून, त्यापूर्वी मंत्रिमंडळात फेरबदल होऊ शकतो. शिवसेना उबाठा, आम आदमी पक्ष व तृणमूल काँग्रेसमध्ये अलीकडेच झालेल्या फुटीच्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित मंत्रिमंडळ विस्तारात या तिन्ही पक्षांच्या फुटीर गटांतील नेत्यांना केंद्रात मंत्रिपदे मिळण्याची चर्चा आहे.

### महाराष्ट्रात सर्वाधिक खासदार असणारा पक्ष

दिल्लीस रवाना होण्यापूर्वी शिंदे यांनी पक्षाचे वरिष्ठ नेते आणि कॅबिनेट मंत्र्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार आणि राज्यातील रखडलेल्या महामंडळ विस्तारावर चर्चा झाल्याचे समजते. उद्धव ठाकरे यांच्या पक्षातील सहा बंडखोर खासदार शिवसेनेत सहभागी झाल्याने शिवसेना खासदारांची संख्या १३ वर गेली आहे. यामुळे तो महाराष्ट्रात सर्वाधिक खासदार असणारा पक्ष ठरला आहे.

### 206 कनिष्ठ महाविद्यालयाचे सांकेतांक गोठवले!

**संभाजीनगर :** राज्य मंडळाच्या वतीने मार्च २०२६मधील बारावी परीक्षेत मंडळाची विषय मान्यता नसतानाही दोनशेपेक्षा अधिक महाविद्यालयांनी 'संगणकशास्त्र', 'इलेक्ट्रॉनिक्स', 'पीकशास्त्र' अशा विषयांसाठी विद्यार्थी परीक्षेला बसवल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

निकालप्रक्रियेनंतर आता छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळाने विभागातील अशा २०६ महाविद्यालयांचे मंडळ सांकेतांक गोठविण्याची कारवाई सुरू केली आहे. विद्यार्थ्यांना याचा कोणताही फटका बसणार नाही.

बारावीच्या परीक्षेत अनेक महाविद्यालयांनी मंडळाची पूर्वपरवानगी न घेताच 'संगणकशास्त्र', 'इलेक्ट्रॉनिक्स' सारख्या विषयांचे विद्यार्थी बसवले. याबाबत विभागीय मंडळाने २०६ महाविद्यालयांवर कारवाईची प्रक्रिया सुरू केली. अशा महाविद्यालयांची यादीही मंडळाने जाहीर केली.

**भारतात परतल्यावर अनेकांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न अधुरे!**



# स्वस्तात एमबीबीएस करण्यासाठी परदेश गाठतात?

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या (एनएमसी) नियमानुसार परदेशातून एमबीबीएस केलेल्या प्रत्येक भारतीय विद्यार्थ्याला भारतात डॉक्टर म्हणून नोंदणी करण्यासाठी एफएमजीई परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. परंतु या परीक्षेतील निकाल सातत्याने धक्कादायक राहिले आहेत.

मुंबईः भारतात सरकारी आणि खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमधील मर्यादित जागा, खासगी शिक्षणाचा प्रचंड खर्च आणि डॉक्टर होण्याची तीव्र इच्छा यामुळे दरवर्षी हजारो भारतीय विद्यार्थी रशिया, जॉर्जिया, कझाकस्तान, किर्गिझस्तान, उझबेकिस्तान, फिलिपिन्स, चीन आणि नेपाळसारख्या देशांत एमबीबीएसचे शिक्षण घेण्यासाठी जातात. मात्र परदेशातून पदवी घेऊन भारतात परतल्यानंतर त्यांच्यासमोर उभी राहणारी फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन (एफएमजीई) ही परीक्षा अनेकांची स्वप्ने उद्ध्वस्त करत असल्याचे गेल्या काही वर्षांतील आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या (एनएमसी) नियमानुसार परदेशातून एमबीबीएस केलेल्या प्रत्येक भारतीय विद्यार्थ्याला भारतात डॉक्टर म्हणून नोंदणी करण्यासाठी एफएमजीई परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. परंतु या परीक्षेतील निकाल सातत्याने धक्कादायक राहिले आहेत. अनेक सत्रांमध्ये दहा विद्यार्थ्यांपैकी केवळ एक किंवा दोनच विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. याचा अर्थ परदेशातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले तरी भारतात डॉक्टर म्हणून काम करण्याची हमी मिळत नाही.

गेल्या काही वर्षांतील एफएमजीईच्या निकालांचा आढावा घेतल्यास २०२१ मध्ये उत्तीर्णतेचे प्रमाण २४.५४ टक्के होते. २०२२ मध्ये ते २३.३५ टक्क्यांवर आले. जून २०२३ मध्ये हा दर केवळ १०.२० टक्क्यांवर घसरला. डिसेंबर २०२३ मध्ये २०.५७ टक्के, जून २०२४ मध्ये २०.८९ टक्के, जून २०२५ मध्ये १८.६१ टक्के, डिसेंबर २०२५ मध्ये २३.९० टक्के, तर जून २०२६ मध्ये पुन्हा फक्त १२.७७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. म्हणजेच गेल्या सहा-सात वर्षांत उत्तीर्णतेचा दर बहुतांश वेळा १० ते २५ टक्क्यांच्या दरम्यानच राहिला आहे.ही आकडेवारी केवळ विद्यार्थ्यांच्या अपयशाची नाही, तर परदेशातील वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जाबाबत आणि भारतातील परवाना परीक्षेतील गुणवत्तेच्या निकषांबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित करते.

तज्ज्ञांच्या मते, सर्वात मोठी समस्या म्हणजे अभ्यासक्रमातील तफावत. अनेक देशांतील एमबीबीएस अभ्यासक्रम भारतातील वैद्यकीय शिक्षणाशी पूर्णपणे सुसंगत नसतो. काही ठिकाणी क्लिनिकल प्रशिक्षण अत्यंत मर्यादित असते, तर काही महाविद्यालयांमध्ये रुग्णांशी प्रत्यक्ष काम करण्याची संधी कमी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांकडे पदवी असली तरी भारतीय वैद्यकीय व्यवस्थेत आवश्यक असलेले व्यावहारिक ज्ञान कमी पडते.कोविड-१९ काळात हजारो विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाइन झाले. अनेकांना महिनोन्?महिने क्लिनिकल पोस्टिंगच मिळाले नाही. त्याचा परिणाम आजही निकालांमध्ये दिसत असल्याचे शिक्षणतज्ज्ञ सांगतात.<भारतात खासगी वैद्यकीय शिक्षणासाठी एक कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च येऊ शकतो. त्याच्या तुलनेत परदेशात २० ते ४० लाख रुपयांत एमबीबीएस पूर्ण होत असल्याने अनेक मध्यमवर्गीय कुटुंबे हा पर्याय स्वीकारतात. मात्र शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एफएमजीई मध्ये वारंवार अपयश आल्यास विद्यार्थ्यांची अनेक वर्षे वाया जातात. त्यांना पुन्हा पुन्हा परीक्षा द्यावी लागते, आर्थिक ताण वाढतो आणि मानसिक तणावालाही सामोरे जावे लागते.

परदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवून देणाऱ्या अनेक एजन्सी ‘१०० टक्के यश’, ‘सोपे शिक्षण’ किंवा ‘भारतात सहज प्रॅक्टिस’ अशा आकर्षक दाव्यांनी विद्यार्थ्यांना भुरळ घालतात. मात्र एफएमजीई च्या प्रत्यक्ष निकालांकडे पाहिले असता हे दावे वास्तवाशी विसंगत असल्याचे दिसते. त्यामुळे केवळ कमी शुल्क किंवा सुलभ प्रवेश न पाहता संबंधित विद्यापीठाचा एफएमजीई निकाल, एनएमसी ची मान्यता, क्लिनिकल प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि माजी विद्यार्थ्यांचा अनुभव तपासणे अत्यावश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने परदेशी वैद्यकीय शिक्षणासाठी काही कठोर निकष लागू केले असले, तरी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झालेली नाही. उलट नीट उत्तीर्ण होऊनही भारतात जागा न मिळाल्याने अनेक विद्यार्थी परदेशाचा पर्याय निवडत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, मान्यताप्राप्त विद्यापीठांची माहिती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत जागरूक करणे ही काळाची गरज बनली आहे.एफएमजीई चा सातत्याने कमी राहणारा निकाल हा केवळ एका परीक्षेचा मुद्दा नाही. तो भारतातील वैद्यकीय शिक्षण व्यवस्था, परदेशातील शिक्षणाची गुणवत्ता आणि हजारो विद्यार्थ्यांच्या करिअरशी थेट संबंधित असलेला गंभीर धोरणात्मक प्रश्न बनला आहे.

# 20 व्या शतकातील मराठी रंगभूमीवर अद्वितीय नट-गायक!



नारायण श्रीपाद राजहंस यांचा स्मृतिदिन


नारायण श्रीपाद राजहंस, ऊर्फ बालगंधर्व यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील नागठाणे येथे २६ जून १८८८ मध्ये झाला. तर मृत्यू पुणे येथे १५ जुलै १९६७ रोजी झाला. ते ‘बालगंधर्व’ या नावाने अधिक लोकप्रिय असलेले विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील मराठी रंगभूमीवरील अभिनेता, गायक आणि नाट्यनिर्माते होते. रंगभूमीवर स्त्रिया अभिनय करीत नसतानाच्या काळात आपल्या हुबेहूब रंगवलेल्या स्त्री-भूमिकांमुळे बालगंधर्वांनी मोठी लोकप्रियता मिळवली. नाट्यगीतांसह ख्याल, ठुमरी, गझल, दादरा, भक्तिगीते यांसारख्या गायन प्रकारांवरही त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. बालगंधर्व हे भास्करबुवा बखले यांचे शिष्य आणि मास्तर कृष्णरावांचे गुरूबंधू होत. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांचे गाणे ऐकून बाळ गंगाधर टिळकांनी त्यांना बालगंधर्व ही पदवी बहाल केली. पुढे ते त्याच नावाने लोकप्रिय झाले.

बालगंधर्वांची रंगभूमीवरील आपली कारकीर्द किर्लोस्कर संगीत मंडळी या नाट्यसंस्थेत इ.स. १९०५ साली आरंभली. मात्र तिचे एक भागीदार नानासाहेब जोगळेकर यांच्या इ.स. १९११ मध्ये निधनानंतर संस्थेत वाद झाले. परिणामी इ.स. १९१३ मध्ये बालगंधर्वांनी, गणेश गोविंद (गणपतराव) बोडस आणि गोविंदराव टेंबे यांच्यासह ती संस्था सोडली आणि गंधर्व संगीत मंडळीची स्थापना केली. मात्र इ.स. १९२१ मध्ये कर्जात अडकलेल्या या नव्या कंपनीचे नारायणराव राजहंस उर्फ बालगंधर्व हे एकमेव मालक होते. त्यानंतर त्यांच्या नाटकांनी मिळवलेल्या लोकप्रियतेच्या जोरावर त्यापुढच्या सात वर्षांत कंपनीने सर्व देणी फेडली. मात्र त्यापुढच्या काळात या संस्थेची आर्थिक स्थिती चढउताराचीच राहिली. नाटकाच्या प्रॉपर्टीसह अनेक गोष्टींमध्ये दर्जा आणि अस्सलपणा राखण्याचा बालगंधर्वांचा आग्रह हेही त्याचे एक कारण सांगितले जाते. पुढे प्रभात फिल्म कंपनीसाठी बालगंधर्वांनी ‘धर्मात्मा’ चित्रपटात संत एकनाथांची भूमिकाही केली. बालगंधर्वांनी आपल्या भूमिका साकारून संगीत नाटक आणि नाट्यसंगीत हे कलाप्रकार मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबांमध्ये लोकप्रिय केले. नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, काकासाहेब खाडिलकर, राम गणेश गडकरी आणि वसंत शांताराम देसाई प्रभृतींनी लिहिलेली अनेक संगीत नाटके बालगंधर्वांनी केली.

भाऊराव कोल्हटकरांच्या इ.स. १९०१ मधील निधनानंतर जेंव्हा संगीत नाटक परंपरेला उतरती कळा आली, त्यानंतर बालगंधर्वांनी या परंपरेत मोलाची भर घालत ती पुढे नेण्याचे महत्त्वाचे कार्य केले. इ.स. १९२९ सालच्या ४२ व्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. स्त्री भूमिकांसाठी महिला कलाकारांची गरज निर्माण झाल्यानंतर एप्रिल इ.स. १९३८ मध्ये गोहर कर्नाटकी यांचा गंधर्व नाटक मंडळीत समावेश झाला. गोहरबाईंनी त्यानंतर कंपनीचा कारभार सांभाळण्यातही सहभाग दिला. इ.स. १९५१ मध्ये नारायणरावांनी गोहरबाईंशी कायदेशीर विवाह केला. इ.स. १९६७ मध्ये बालगंधर्वांचा मृत्यू झाला.

त्यांनी संगीत सौभद्र, संगीत मृच्छकटिक, संगीत शाकुंतल, संगीत मानापमान, संगीत संशयकल्लोळ, संगीत शारदा, संगीत मूकनायक, संगीत स्वयंवर (नाटक), संगीत विद्याहरण, संगीत एकच प्याला, संगीत कान्होपात्रासह एकूण २५ विविध नाटकांत भूमिका केल्या. त्यांची संगीत शाकुंतल नाटकातील ‘शकुंतला’ व मानापमान नाटकातील ‘भामिनी’ या भूमिकांमुळे एक प्रतिभावंत कलाकार म्हणून त्यांचे नाव सर्वत्र झाले. इ.स. १९५५ रोजी त्यांनी एकच प्याला नाटकात साकार केलेली सिंधू ही त्यांची शेवटची भूमिका ठरली. त्यानंतर त्यांनी रंगभूमीवरून निवृत्ती घेतली. बालगंधर्वाच्या रंगभूमीवरल्या कारकिर्दीला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल ‘रत्नाकर’ मासिकाने १९३१ मधल्या जुलैचा अंक ‘गंधर्व अंक’ काढला होता. त्यानिमित्ताने ‘बालगंधर्वांची सर्वोत्कृष्ट भूमिका कोणती?’ असा प्रश्न वाचकांना विचारून सर्वेक्षण केले होते. तेव्हा वाचकांनी त्यांच्या ‘एकच प्याला’मधल्या सिंधूला सर्वाधिक पसंती दिली होती.

# प्रख्यात प्रिंटमेकर, शिल्पकार : कृष्णा रेड्डी



कृष्णा रेड्डी यांचा जन्म १५ जुलै १९२५ रोजी भारतातील आंध्र प्रदेशातील चित्तूरजवळ असलेल्या नंदनूर नावाच्या एका छोट्या गावात झाला. त्यांचे वडील एक शेतमजूर होते, जे मंदिरांमध्ये भित्तिचित्रे देखील रंगवत असत. रेड्डी यांनी १९४१ ते १९४६ या काळात विश्व-भारती विद्यापीठाच्या कला भवनात (ललित कला संस्था) नंदलाल बोस यांच्यासोबत शिक्षण घेतले आणि ललित कलेत पदवी प्राप्त केली. १९४७ ते १९४९ या काळात ते कलाक्षेत्र फाउंडेशनमध्ये कला विभागाचे प्रमुख होते आणि मद्रासमधील मॉन्टेसरी शिक्षक प्रशिक्षण केंद्रात कला शिकवत होते. याच काळात त्यांना शिल्पकला आणि चित्रकलेत रस निर्माण झाला. १९४९ मध्ये, ते लंडनला गेले आणि लंडन विद्यापीठाच्या स्लेड स्कूल ऑफ फाइन आर्ट्समध्ये हेन्री मूर यांच्याकडे शिल्पकलेचा अभ्यास सुरू ठेवला. १९५० मध्ये, रेड्डी पॅरिसला गेले आणि कलाकार कॉन्स्टँटिन ब्रँकुसी यांना भेटले . ब्रँकुसी यांच्यामुळे त्यांची कलेवरील कॅफे चर्चांशी ओळख झाली आणि स्टुडिओ भेटीदरम्यान ते अनेक प्रसिद्ध कलाकारांना भेटले. पॅरिसमधील वास्तव्यादरम्यान त्यांनी ओसिप झाडकिन यांच्याकडे शिल्पकला आणि स्टॅनले विल्यम हेयटर यांच्याकडे कोरीवकाम यांचा अभ्यास केला.

१९५७ मध्ये, त्यांनी मारिनो मारिनी यांच्या हाताखाली शिक्षण घेण्यासाठी मिलानमधील अकॅडेमिया दि बेले आर्टी दि ब्रेरा (ब्रेरा अकादमी) येथे प्रवास केला. २०१६ मध्ये ते मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्टमधील ‘वर्कशॉप अँड लेगसी: स्टॅनले विल्यम हेयटर, कृष्णा रेड्डी, झरिना हाश्मी’ या प्रदर्शनातील विषयांपैकी एक होते. त्यांचे कार्य वॉशिंग्टन, डीसी येथील नॅशनल गॅलरी ऑफ आर्टच्या कायमस्वरूपी संग्रहात आढळू शकते.

रेड्डी यांना इंटॅग्लिओ प्रिंटमेकिंगमधील एक मास्टर मानले जात होते आणि १९६५ नंतर ते हेटरच्या अटेलियर १७ मध्ये सहयोगी संचालक होते. अटेलियर १७, एक भरभराटीला आलेली कलाकारांची कार्यशाळा, १९२७ मध्ये हेटरने स्थापन केली होती आणि ती मूळतः पॅरिसमध्ये होती; तथापि, १९३९ आणि १९४० दरम्यान ही कार्यशाळा न्यूयॉर्क शहरात आणि १९५० मध्ये पुन्हा पॅरिसला हलवण्यात आली. अटेलियर १७ हे जोन मिरो , पाब्लो पिकासो , अल्बर्टो जियाकोमेटी , जुआन कार्डेनास , कॉन्स्टँटिन ब्रँकुसी आणि झरिना हाश्मी यांसारख्या युरोपियन आणि अमेरिकन कलाकारांसाठी त्यांच्या कला पद्धतींमध्ये प्रयोग करण्याचे नेहमीच एक भेटीचे ठिकाण राहिले आहे.

रेड्डींच्या तंत्र आणि शैलीने त्यांना एक महत्त्वाचे प्रिंटमेकर म्हणून ओळख मिळवून दिली. रेड्डींचे प्रिंट्स अमूर्त असून, ते गुंतागुंतीच्या टेक्स्चरायझेशन असलेल्या प्लेट्सवर सूक्ष्म ग्रिड-सारख्या डिझाइनने तयार केलेले आहेत. त्यांनी प्रिंट्समध्ये सादर केलेले असंख्य गुंतागुंतीचे रंग निसर्गाच्या अनंत रहस्यांकडे पाहण्याच्या चिंतनशील दृष्टिकोनातून दिसून येतात. अटेलियर १७ मध्ये काम करत असताना, रेड्डींनी शाईच्या चिकटपणा आणि स्निग्धतेचा उपयोग करून एकाच प्रिंटिंग मॅट्रिक्समधून बहु-रंगीत प्रिंट्स तयार करण्यासाठी एक नवीन छपाई प्रक्रिया विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याला नंतर व्हिस्कोसिटी प्रिंटिंग असे नाव देण्यात आले. रेड्डींनी नंतर न्यूयॉर्कमधील रॉबर्ट ब्लॅकबर्नच्या प्रिंटमेकिंग वर्कशॉपमध्ये व्हिस्कोसिटी एचिंग तंत्र शिकवले. कला क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल रेड्डी यांना १९७२ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


रेड्डी हे अमेरिकेतील मेरीलँड इन्स्टिट्यूट कॉलेज ऑफ आर्ट, प्रॅट इन्स्टिट्यूट , रस्किन कॉलेज स्कूल ऑफ फाइन आर्ट अँड ड्रॉइंग, टेक्सास विद्यापीठ आणि इतर अनेक विद्यापीठांमध्ये अतिथी प्राध्यापक आणि व्याख्याते होते. रेड्डींच्या विद्यार्थ्यांमध्ये कॅथलीन मेरी स्पॅग्नोलो आणि इलेन ब्रेगर या कलाकारांचा समावेश आहे. रेड्डी यांचे २२ ऑगस्ट २०१८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले.

# युवकांना आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करून आत्मनिर्भर बनवा!

दरवर्षी १५ जुलै रोजी ‘जागतिक युवा कौशल्य दिन’ साजरा केला जातो. तरुणांना रोजगार, उद्योजकता आणि शाश्वत विकासासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांनी सुसज्ज करणे आणि त्यांना आत्मनिर्भर बनवणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. संयुक्त राष्ट्र महासभेने डिसेंबर २०१४ मध्ये ठराव संमत करून १५ जुलै हा दिवस जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २०१५ पासून जगभरात हा दिवस विविध उपक्रमांनी साजरा केला जात आहे. सध्याच्या डिजिटल युगात केवळ शैक्षणिक पदवी असणे पुरेसे नाही, तर रोजगाराच्या नवीन संधी मिळवण्यासाठी व्यावहारिक आणि तांत्रिक कौशल्यांची जोड असणे आवश्यक आहे. कौशल्य विकासाच्या माध्यमातून बेरोजगारीचे प्रमाण कमी करणे, युवकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी (उद्योजकता) प्रेरित करणे आवश्यक आहे. भारतात २०१५ मध्ये सुरू झालेल्या या अभियानांतर्गत आयटीआय आणि इतर संस्थांमार्फत तरुणांना विविध क्षेत्रांचे प्रशिक्षण दिले जाते

तरुणांना रोजगार, सन्मानजनक काम आणि उद्योजकतेसाठी कौशल्यांनी सुसज्ज करण्याच्या धोरणात्मक महत्त्वाचा गौरव करण्यासाठी, २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने १५ जुलै हा ‘जागतिक युवा कौशल्य दिन’ म्हणून घोषित केला. कामाचे जग झपाट्याने बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित संक्रमण आणि वाढती सामाजिक गुंतागुंत यांमुळे आपण कसे शिकतो, काम करतो आणि समाजात कसे सहभागी होतो, यात परिवर्तन घडत आहे. या बदलत्या परिस्थितीत यशस्वी होण्यासाठी, तरुणांना केवळ तांत्रिक कौशल्यांपेक्षा अधिकची गरज आहे. त्यांना अशा संतुलित क्षमतांच्या संचाची आवश्यकता आहे, ज्यात तांत्रिक, डिजिटल, एआय, हरित, सामाजिक-भावनिक आणि नागरी कौशल्यांसोबतच अशा मानवी गुणांचाही समावेश असेल, ज्यांची जागा तंत्रज्ञान घेऊ शकत नाही.

‘सामायिक भविष्यासाठी कौशल्ये’ या संकल्पनेअंतर्गत, या वर्षीच्या जागतिक युवा कौशल्य दिनाच्या उपक्रमांमध्ये नाविन्यपूर्ण युवा कौशल्य कार्यक्रमांच्या तातडीच्या गरजेवर प्रकाश टाकला जाईल. असे उपक्रम जे तरुणांना केवळ जुळवून घेण्यासच नव्हे, तर सहानुभूतीने नेतृत्व करण्यास, सांस्कृतिक दरी सांधण्यास, लवचिकता निर्माण करण्यास आणि अधिक शाश्वत व सर्वसमावेशक उद्याला सक्रियपणे आकार देण्यास सक्षम करतील. युनेस्को-युनेवोक द्वारे आयोजित हा वेबिनार, सरकार, शिक्षणतज्ञ, नियोक्ते आणि तरुणांना एका महत्त्वपूर्ण प्रश्नावर विचार करण्यासाठी एकत्र आणतो. ‘सामायिक भविष्यात यशस्वी होण्यासाठी प्रत्येक तरुणाला आवश्यक असलेल्या क्षमतांनी सुसज्ज करण्यासाठी काय करावे लागेल’



आज जागतिक युवा कौशल्य दिन

### जागतिक युवा कौशल्य दिन महत्त्वाचा का आहे?

जगभरात तरुण बेरोजगारी हे एक मोठे आर्थिक आणि सामाजिक आव्हान आहे. आयएलओच्या ‘ ग्लोबल एम्प्लॉयमेंट ट्रेंड्स फॉर यूथ २०२४’ नुसार , २०२३ मध्ये जागतिक तरुण बेरोजगारीचा दर १५ वर्षांतील नीचांकी पातळीवर म्हणजेच १३ टक्केपर्यंत खाली आला, जो महामारीपूर्वीच्या १३.८ टक्क्याच्या पातळीपेक्षाही कमी आहे. तथापि, ही सुधारणा असमान राहिली आहे. अरब देश, पूर्व आशिया आणि दक्षिण-पूर्व आशियामध्ये, २०२३ मधील दर २०१९ पेक्षा जास्त होते. दरम्यान, जागतिक स्तरावर प्रत्येक पाच तरुणांपैकी एक जण आणि एक चतुर्थांशपेक्षा जास्त तरुण स्त्रिया एनईईटी (रोजगार, शिक्षण किंवा प्रशिक्षणात नसलेल्या) होत्या, आणि तरुण स्त्रियांचा एनईईटी दर (२८.१ टक्के) तरुण पुरुषांच्या दरापेक्षा (१३.१ टक्के) दुप्पटीहून अधिक होता.

जे काम करतात त्यांच्यासाठीही चांगल्या नोकऱ्या दुर्मिळ आहेत. निम्म्याहून अधिक तरुण कामगार अनौपचारिक रोजगारात आहेत आणि कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये, चारपैकी तीन जण केवळ स्वयंरोजगार किंवा तात्पुरत्या नोकऱ्या करतात. हरित आणि नील क्षेत्रांमधील गुंतवणुकीमुळे २०३० पर्यंत ८४ लाख तरुणांसाठी नोकऱ्या निर्माण होऊ शकतात, परंतु या नोकऱ्या चांगल्या कामाच्या परिस्थितीसह मिळायला हव्यात. ज्यामध्ये समान वेतन, सामूहिक वाटाघाटी आणि छळापासून संरक्षण यांसारख्या मूलभूत हक्कांचा समावेश आहे.

### तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षणाची भूमिका काय असते?

२०३० अजेंडा साध्य करण्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षण हे केंद्रस्थानी आहेत. इंचिओन जाहीरनाम्यातील ‘शिक्षण २०३०’ ही संकल्पना शाश्वत विकास ध्येय ४, ‘सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि न्याय्य दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करणे आणि आजीवन शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देणे’ यामध्ये पूर्णपणे सामावलेली आहे. ‘शिक्षण २०३०’ मध्ये तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्य विकासावर, विशेषतः परवडणाऱ्या दर्जेदार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणाच्या उपलब्धतेवर; रोजगार, सन्मानजनक काम आणि उद्योजकतेसाठी तांत्रिक व व्यावसायिक कौशल्ये प्राप्त करण्यावर; लैंगिक विषमतेचे निर्मूलन करण्यावर आणि दुर्बळ घटकांना संधी सुनिश्चित करण्यावर लक्षणीय भर दिला आहे. या संदर्भात, टीव्हीईटीकडून आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय स्वरूपाच्या अनेक मागण्या पूर्ण करण्याची अपेक्षा आहे. याद्वारे युवक आणि प्रौढांना रोजगार, सन्मानजनक काम आणि उद्योजकतेसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मदत करणे, न्याय्य, सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वाढीस प्रोत्साहन देणे, तसेच हरित अर्थव्यवस्था आणि पर्यावरणीय शाश्वततेकडे होणाऱ्या संक्रमणास पाठिंबा देणे अपेक्षित आहे.

व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण (टीव्हीईटी) युवकांना रोजगाराच्या जगात प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांनी सुसज्ज करू शकते, ज्यामध्ये स्वयंरोजगारासाठीच्या कौशल्यांचाही समावेश आहे. टीव्हीईटी कंपन्या आणि समुदायांकडून बदलत्या कौशल्यांच्या मागण्यांना प्रतिसाद देण्याची क्षमता सुधारू शकते, उत्पादकता वाढवू शकते आणि वेतनाची पातळी वाढवू शकते. टीव्हीईटी रोजगाराच्या जगात प्रवेशातील अडथळे कमी करू शकते, उदाहरणार्थ, कार्य-आधारित शिक्षणाद्वारे आणि प्राप्त केलेल्या कौशल्यांना मान्यता व प्रमाणपत्र मिळेल याची खात्री करून. टीव्हीईटी कमी-कुशल, अर्ध-बेरोजगार किंवा बेरोजगार व्यक्ती, शाळाबाह्य युवक आणि शिक्षण, रोजगार व प्रशिक्षणात नसलेल्या व्यक्तींनाही कौशल्य विकासाच्या संधी देऊ शकते.

# महाराष्ट्रातील जल प्रकल्पाची स्थिती चिंताजनक



महाराष्ट्रातील जल प्रकल्पांची सद्यस्थिती अत्यंत चिंताजनक व असमान आहे. पावसाचे असमान वितरण आणि अपुऱ्या नियोजनामुळे अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मराठवाडा (उदा. जालना, बीड) व उत्तर महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प कोरडे पडले आहेत, तर पुणे विभागातील काही धरणांमध्ये समाधानकारक जलसाठा आहे.

राज्यातील जल प्रकल्पांच्या स्थितीचा महत्त्वाचा आढावा खालीलप्रमाणे आहे: मराठवाडा व विदर्भ (तीव्र टंचाई)जालना: जिल्ह्यातील ६७ पैकी तब्बल ३४ लघु प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठा शून्य झाला आहे. एकूण साठा केवळ १२.४६ टक्क्यांवर आला आहे.धाराशिव: जिल्ह्यातील २२५ प्रकल्पांपैकी २३ प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले आहेत, तर लोअर तेरणा व मांजरा या प्रमुख धरणांमधील साठा अनुक्रमे ३२% व १७% च्या आसपास आहे.२. पश्चिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्र (मिश्र स्थिती) उजनी धरण: सोलापूरची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातील पाणीपातळी घटून उपयुक्त साठा उणे (मायनस) पातळीत गेला आहे.पुणे व सातारा धरणसाखळी: कोयना आणि खडकवासला साखळी प्रकल्पांमध्ये पावसाच्या आगमनानंतर पाणीसाठ्यात वाढ होत असली, तरी बाष्पीभवन आणि अनियमित पावसामुळे जलव्यवस्थापनाचे आव्हान कायम आहे.३. उपलब्ध पाण्याचे असमान वितरणराज्यातील एकूण उपलब्ध पाण्याच्या (४४४७.८ टीएमसी) ५५ टक्के पाणी एकट्या कोकणात उपलब्ध आहे. याउलट, सह्याद्रीच्या पूर्वेकडील पर्जन्यछायेच्या प्रदेशात (मराठवाडा, सोलापूर, अहमदनगर) पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने जल प्रकल्पांची स्थिती दरवर्षी बिकट बनते.४. महत्त्वाचे जलविषयक निर्णयप्रलंबित असलेल्या नर्मदा पाणी वाटपाचा तिढा सुटल्यामुळे महाराष्ट्राला आता नर्मदा नदीतून १० टीएमसी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# अकोला जिल्ह्यात बोगस बियाणे कंपन्यांचा हैदोस

## कृषी आयुक्तालयाच्या भूमिकेवर संशयाची सुई

## बियाणे सॅम्पलचे अहवाल उशिराने का, उच्चस्तरीय चौकशीची मागणी !

प्रतिनिधी १५ जुलै

**अकोला :** खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बोगस बियाण्यांचा मोठा फटका बसला असून, या संपूर्ण प्रकरणावरून आता जिल्हा कृषी विभाग आणि थेट राज्याच्या कृषी आयुक्तालयाची भूमिका संशयाच्या भोऱ्यात सापडली आहे. जिल्ह्यात बोगस बियाणे कंपन्यांनी उच्छाद मांडला असताना, कृषी प्रशासनाची ढिसाळ आणि संशयास्पद कामगिरी चव्हाट्यावर आली आहे. बियाणे उगवण क्षमता तपासण्याच्या सॅम्पलचे अहवाल उशिरा पाठविणाऱ्यांवर कारवाई का नाही. अशी विचारणा आता होत आहे.

जिल्ह्यात सोयाबीनच्या बोगस आणि सदोष बियाण्यांबाबत शेतकऱ्यांनी तक्रारींचा पाऊस पाडला आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यात तक्रारींचा आकडा १४०० च्या पार (एकूण १,७२२ तक्रारी) गेला



आहे. धक्कादायक बाब म्हणजे, एवढ्या प्रचंड प्रमाणावर आलेल्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रशासनाकडे शासनाचे ७ आणि जिल्हा परिषदेचे ७ मिळून अवघे १४ निरीक्षक तैनात आहेत. या १४ निरीक्षकांच्या भरवशावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या फसवणुकीची चौकशी कशी होणार आणि शेतकऱ्यांना न्याय कसा मिळणार, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. त्यामुळे बोगस कंपन्यांना परवानग्यांचे वाटप करणाऱ्या आणि शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या कृषी आयुक्तालयाचीच आता उच्चस्तरीय चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून आणि लोकप्रतिनिधींकडून केली जात आहे.

### बियाणे कंपन्यांना अभय देणाऱ्या 'कृषी आयुक्तालयाची' चौकशी करा!

जिल्हा स्तरावरून बियाणे कंपन्यांना विक्रीची थेट परवानगी दिली जात नाही, तर ही सर्व सूत्रे राज्याच्या कृषी आयुक्तालयातून हलतात. अकोला जिल्ह्यात धुमाकूळ घालणाऱ्या बुस्टर सीड्स , रवी सीड्स , ओसवाल सीड्स, उन्नती आणि इनोव्हेज यांसारख्या कंपन्यांना कृषी आयुक्तालयाने डोळे झाकून परवानग्या दिल्याच कशा, हा आता सर्वात मोठा यक्षप्रश्न आहे. या कंपन्यांबद्दल तक्रारी आल्या असताना तो सोडविण्यासाठी शासन स्तरावर कुठली उपाय योजना आहे. त्याच बरोबर ज्या शेतकऱ्यांचे खरिप हंगामात हे नुकसान झाले त्या कोरडवाहू शेतकऱ्यांची मदत कोण करणार अशी विचारणा शेतकरी करत आहे.

### 'सोयाबीनचे मे महिन्यात सॅम्पल घेऊ नका!' – हा अजब आदेश कोणाचा?

या संपूर्ण घोटाळ्यात सर्वात संशयास्पद आणि गंभीर बाब म्हणजे, 'मे महिन्यात सोयाबीनचे सॅम्पल (नमुने) घेऊ नका,' असा एक अजब अलिखित नियम किंवा आदेश पुढे आला आहे. सोयाबीनची सॅम्पलिंग केवळ जून आणि जुलै महिन्यातच केली जाते, असे कारण पुढे केले जात आहे. कृषी आयुक्तालयात कोणी हा आदेश दिला अशी विचारणा आता होत आहे. जर मे महिन्यात बियाणे बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होते आणि शेतकरी ते खरेदी करत होते, तर मग मे महिन्यात त्याचे नमुने घेण्यास कोणी आणि का मज्जाव केला ? हा आदेश नेमका कोणाचा होता ? बोगस बियाणे कंपन्यांना मे महिन्यात मोकळे रान देऊन शेतकऱ्यांची लूट करण्यासाठीच हा जाणीवपूर्वक उशीर करण्यात आला का ? लॅबचे रिपोर्ट २१ दिवसांनी उशिरा येण्यामागे कोणाला वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे ?

# विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहिमेचा टॅक्स वसुलीवर परिणाम

## भविष्यातील विकास योजनांवर होईल परिणाम

प्रतिनिधी १५ जुलै



**अकोला :** सध्या महानगरपालिकेचा कर विभाग अतिरिक्त कामाच्या भाराशी झुंजत आहे. कर विभागाचे कर्मचारी विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेत व्यस्त आहेत. याचा परिणाम नियमित कर संकलन मोहिम, कर न भरणाऱ्यांना नोटिसा बजावणे, वैयक्तिक तपासणी, आणि जप्ती कारवायांवर झाला आहे.

**दिवसेंदिवस वाढत आहे मालमत्ता कराची थकबाकी**

शहरातील मालमत्ता कराची थकबाकी दिवसेंदिवस वाढत असून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चिंताजनक झाली आहे. मालमत्ता धारकांवर 204 कोटी रुपयांची थकबाकी असून प्रशासन ती वसूल करण्यात अपयशी ठरत आहे. परिणामी महापालिकेच्या तिजोरीवर प्रचंड दबाव आला आहे . आणि विकास प्रकल्प, कंत्राटदारांचे देयक, व दैनंदिन प्रशासकीय खर्च भागवण्यासाठी प्रशासन धडपडत आहे. कर वसूल करण्यासाठी अभय योजना, माफी आणि जप्ती यासारख्या अनेक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. परंतु अपेक्षित परिणाम साध्य झाला नाही. तर दुसरीकडे विशेष सखोल मतदार पुनरिक्षण च्या कामासाठी कर विभागाच्या कर्मचाऱ्यांवरील वाढत्या दबावामुळे कर वसुली मोहीम अक्षरशः ठप्प झाली आहे. त्यामुळे शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेला महसूल उभारण्यात प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. मालमत्ता कर हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत मानला जातो. शहराला रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, बगीचे, आरोग्य सुविधा, आणि इतर नागरि सेवांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. हा निधी प्रामुख्याने मालमत्ता करातून मिळतो. मात्र गेल्या काही वर्षांपासून कर वसुली मंदावली आहे आणि थकबाकी सातत्याने वाढत आहे.

**बिल मिळत नसल्याने कंत्राटदारही नाराज?**

कर वसुली न झाल्याने महापालिकेच्या तिजोरीत खडखडाट जाणवत आहे. ज्यामुळे अनेक विकास प्रकल्पांच्या देय रकमेवर परिणाम होत आहे. शहरातील रस्ते, नाले, पाणीपुरवठा, आणि इतर कामें करणाऱ्या कंत्राटदारांना वेळेवर पैसे देणे प्रशासनाला अवघड जात आहे. यामुळे विकास कामाची गती मंदावत आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मोठा भाग टॅक्स वसुलीतून येतो. त्यामुळे थकबाकी वसूल न झाल्यास भविष्यातील विकास योजनांवर याचा परिणाम होणे निश्चित आहे. मध्यंतरी महापालिका प्रशासनाने टॅक्स थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध करण्याचा इशारा दिला होता. मात्र हे प्रत्यक्षात झाले नाही भविष्यात ठोस कारवाई न केल्यास प्रशासनाला मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागेल.

# बोगस सोयाबीन प्रकरण, दोषींवर कारवाई कधी?

प्रतिनिधी १५ जुलै

**हिवरखेड :** परिसरात बोगस किंवा निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांमुळे अनेक शेतकऱ्यांचे पीक उगवले नसल्याचा गंभीर प्रश्न ऐरणीवर असतानाच या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, काही कृषी सेवा केंद्रांनी बियाण्याच्या किमतीएवढे खत किंवा इतर कृषी साहित्य देऊन शेतकऱ्यांकडून "बियाण्याबाबत मी समाधानी आहे" असे लेखी पत्र लिहून घेतले. आता याच पत्राचा आधार घेत काही अधिकाऱ्यांकडून नुकसानभरपाईच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, बियाण्याची किंमत परत मिळणे हा वेगळा मुद्दा आहे; मात्र सोयाबीन उगवले नसल्याने दुबार पेरणी, मशागत, मजुरी, इंधन, वेळ आणि उत्पादनातील घट यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत केवळ बियाण्याच्या किमतीएवढे साहित्य देऊन शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान भरून निघू शकत नाही. दरम्यान, या प्रकरणात संबंधित कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी अद्याप या प्रकरणाचा अंतिम अहवाल तयार झालेला नसल्याचे सांगितल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली आहे. यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. जर अहवालच तयार झालेला नाही, तर शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईबाबत निर्णय कधी होणार? दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई कधी होणार? आणि अहवाल पूर्ण होण्यास इतका विलंब का होत आहे? विशेष म्हणजे, एका बाजूला अहवाल तयार नसल्याचे सांगितले जात आहे, तर दुसऱ्या बाजूला "समाधानी" पत्राचा आधार घेऊन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणार नाही, असा संदेश दिला जात असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. त्यामुळे प्रशासनाची भूमिका नेमकी काय आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, अनेकांनी कर्ज काढून पेरणी केली होती. बियाणे उगवले नाही म्हणून पुन्हा पेरणी करावी लागली. अतिरिक्त खर्च झाला, वेळ गेला आणि पावसाच्या बदलत्या परिस्थितीचा फटका बसला. या सर्व नुकसानीची भरपाई कोण करणार, असा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे.

### शेतकरी प्रशासनाकडे पुढील मागण्या करत आहेत

» निकृष्ट किंवा उगवण न झालेल्या बियाण्यांच्या प्रकरणाचा अहवाल तातडीने पूर्ण करून सार्वजनिक करावा. सर्व बाधित शेतकऱ्यांचे पंचनामे आणि तपास पूर्ण करून नुकसानभरपाई निश्चित करावी. दोषी आढळणाऱ्या बियाणे उत्पादक कंपनी, विक्रेते किंवा इतर संबंधित जबाबदारांवर कायद्यानुसार तातडीने कारवाई करावी.

"समाधानी" पत्र कोणत्या परिस्थितीत घेतले गेले, याचीही स्वतंत्र चौकशी करावी आणि अशा पत्रांमुळे शेतकऱ्यांचा कायदेशीर हक्क बाधित होणार नाही, याची स्पष्ट भूमिका प्रशासनाने जाहीर करावी.

# सिंचन अनुदानासाठी आता 'सेंट्रल बँक डिजिटल चलन' प्रणाली;

## अमरावतीसह 21 जिल्ह्यांत अंमलबजावणी

प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा-२) अंतर्गत राज्यातील 21 जिल्ह्यांमधील 7 हजार 201 गावांमधील अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती आणि सर्व महिला शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान आता 'सेंट्रल बँक डिजिटल चलन' (सीबीडीसी) या डिजिटल प्रणालीद्वारे थेट वितरित करण्यात येणार आहे. नाशिक, नागपूर आणि चंद्रपूर येथील यशस्वी प्रयोगानंतर आता अमरावतीसह सर्व प्रकल्प जिल्ह्यांत ही पद्धत लागू झाली आहे. जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने चालणाऱ्या या प्रकल्पात पूर्वी लागू असलेल्या 'बॅक-एंडेड सबसिडी' पद्धतीमुळे शेतकऱ्यांना सुरुवातीला स्वतःच्या खिशातून पूर्ण रक्कम खर्च करून सिंचन संच खरेदी करावा लागायचा. भांडवलाअभावी अनेक अल्पभूधारक शेतकरी या योजनेपासून वंचित राहायचे. ही अडचण दूर करण्यासाठी शासनाने 'सीबीडीसी' आधारित फ्रंट एंडेड प्रणाली लागू केली आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांवर सुरुवातीला पैसे उभारण्याचा ताण पडणार नाही. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी डीबीटी पोर्टलवर अर्ज करताना 'P-CBDC' हा पर्याय निवडून 'PNB Digital Rupee App' डाऊनलोड करायचे आहे. पूर्वसंमती मिळताच शेतकऱ्यांच्या डिजिटल वॉलेटमध्ये अनुदानाच्या रकमेइतके डिजिटल टोकन जमा होतील. हे टोकन अधिकृत विक्रेत्याकडे क्यूआर कोडद्वारे स्कॅन करून वापरता येतील. शेतकऱ्यांना केवळ उर्वरित रक्कम भरून संच खरेदी करता येईल आणि यासाठी बँकेत स्वतंत्र खाते उघडण्याची गरज नाही. प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण झाल्यावर अनुदानाची अंतिम रक्कम विक्रेत्याच्या खात्यात जमा केली जाईल. ही सुरक्षित व पारदर्शक डिजिटल प्रणाली सूक्ष्म सिंचनाचा प्रसार वेगाने वाढवणारी ठरणार असून, पात्र लाभार्थ्यांनी याचा लाभ घेण्यासाठी जवळच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अर्चना निस्ताने यांनी केले आहे.

# जठारपेठ भागात लोंबणारी धोकादायक विद्युत तार



प्रतिनिधी १५ जुलै

**अकोला :** जठारपेठेत प्रसाद कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रवाहित विद्युत तार लोंबत आहे. अतिशय धोकादायक असा प्रकार आहे परंतु महावितरणचे याकडे लक्ष नाही. याठिकाणी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वेळीच लक्ष देऊन दुरूस्ती करावी अशी मागणी आहे.

ही तार इतकी खाली आली आहे की वाहनांना स्पर्श करीत आहे. बाजूला इमारत बांधकाम सुरू असल्याने वाहनांची ये जा सुरू असते.

शाळेच्या बसेस देखील येथे उभ्या असतात. लोंबणारी प्रवाहित विद्युत तार तातडीने व्यवस्थित करावी. महावितरण यंत्रणेने गांभीर्य लक्षात घ्यावे अशी मागणी केली जात आहे.

# राष्ट्रीय शाळेचा वर्धापन दिन माजी विद्यार्थी संघाच्या वतीने उत्साहात साजरा

प्रतिनिधी १५ जुलै



**अकोला :** स्थानिक टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर शाळा उमरी मोठी अकोला येथे ऐतिहासिक शाळेचा वर्धापन दिन माजी विद्यार्थी संघाच्या वतीने उत्साहात संपन्न झाला. शाळेला १०७ वर्ष पूर्ण झाली सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक स्व. आबासाहेब कुलकर्णी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुधाकर जोशी हे होते तर उद्घाटक म्हणून काशिनाथ चौधरी हे होते कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून. शंकरराव टापरे, विश्वास बोराडे, दिगंबर वनारे, उमेश मसने, दत्ता कोल्हे, नयनाताई इनामदार, संध्याताई भटकर, गजानन धामणकर, शिवाजीराव बचाटे, भिकाजी इंगळे ,विजेंद्र वरोकार, इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती तर उपस्थिती म्हणून प्रकाश मालगन, सुनील भातुलकर, किरण सावके, संजय पळसपगार,शैलेश ओळंबे, अरुण धनभर, देवानंद इंगळे यांची उपस्थिती होती . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंबादास निकाळजे, शरद इंगोले, रवींद्र वानखडे, प्रमोद टाळे, सुभाष गायकवाड, संतोष गावंडे प्रशांत गिरी माजी विद्यार्थी संघाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाला. आजी-माजी शिक्षक व कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल राव थोटे यांनी केले तर आभार प्रदर्शन उमेश मसने यांनी केले.

# फुल फळ रोपे विक्रेत्यांकडून अतिक्रमण



प्रतिनिधी १५ जुलै

## महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने लक्ष द्यावे

**अकोला :** शहरात दररोज अतिक्रमणाचा विळखा दिसून येतो. सध्या पावसाळा सुरू आहे. यावेळी फुले फळ रोपे विक्रेत्यांकडून अशोक वाटिका ते नेहरू पार्क रस्त्यावर कुंड्या ठेवलेल्या दिसतात. रोपांची लागवड करण्यासाठी लहान मोठ्या कुंड्या विक्रीसाठी आणल्या आहेत. रस्त्यावर पसारा मांडल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची गैरसोय होत आहे.

उड्डाणपुलाला लागून अशोक वाटिका ते नेहरू पार्क रस्त्यावर फळ, फुले विक्रेत्यांनी रस्त्यावर दुकानदारी सुरू केलेली दिसते. त्यामुळे वाहन चालकांची पंचाईत होत आहे. या विक्रेत्यांना महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने समज देण्याची गरज आहे. आपल्या कक्षेत दुकानदारी करावी, जेणेकरून नागरिकांना त्रास होणार नाही.

# राजेंद्र कॉलनी, विजय कॉलनी नजीक युवकाची हत्या

प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** शेख आफाक शेख शकील रा (ताज नगर) यांची भोसकून हत्या करण्यात आली आहे.



ही आज सकाळी उघडकीस आली. परिसरात आफाकचा कापलेला हात आढळून आला. पोरवाल सिमेंट डेपोच्या जवळ जमिनीवर रक्ताचा मोठा सळा दिसून आला. ही घटना सकाळी ८:०० वाजता घडली. , ज्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. सकाळी ९:३० वाजता इर्विन रुग्णालयात आफाक या तरुणाचा मृत्यू झाल्याची बातमी समोर आली. आफाकच्या मानेवर आणि छातीवर वार करण्यात आले होते. तसेच त्याचा हातही कापला गेला होता. पोलिस या प्रकरणाचा तपास करीत आहे, परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले जात आहेत.

### हाताचा पंजा कापला

# तेल्हारा पंचायत समितीतील एपीओ एसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी १५ जुलै

**तेल्हारा :** पंचायत समिती मधील सहायक कार्यक्रम अधिकारी (एपीओ) संदीप विवय झाडोकार यांना ६ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) अकोला पथकाने मंगळवारी रंगेहात पकडले. या प्रकरणात तांत्रिक सहाय्यक शिरीष सदापुरे यांनाही ताब्यात घेण्यात आले असून, दोघांविरुद्ध तेल्हारा पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती एसीबीने दिली. एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे बांधकाम साहित्य पुरवठ्याचा व्यवसाय करतात. सन २०२३-२४ मध्ये ग्रामपंचायत पिवंदळ खुर्द येथील आर.सी. मातोश्री पांदण रस्त्याच्या कामासाठी त्यांनी साहित्य पुरवठा केला होता. या साहित्याचे सुमारे १४ लाख ७८ हजार रुपयांचे देयक ग्रामपंचायतीकडे प्रलंबित होते. हे देयक मंजूर करून देण्यासाठी पंचायत समिती, तेल्हारा येथील तांत्रिक सहाय्यक शिरीष सदापुरे आणि सहायक कार्यक्रम अधिकारी संदीप झाडोकार यांनी सुरुवातीला ७ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप तक्रारदाराने एसीबीकडे केला. तसेच देयक मंजूर झाल्यानंतर साहित्य पुरवठ्याच्या १४.७८ लाखांच्या देयकासाठी ६ हजारांची लाच स्वीकारताना अटक; तांत्रिक सहायकालाही घेतले ताब्यात १४ लाखांच्या रकमेवर प्रत्येकी एक टक्का, म्हणजेच १४ हजार रुपये स्वतंत्रपणे देण्याचीही मागणी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. तक्रारीची ८ जुलै २०२६ रोजी पडताळणी करण्यात आली. पडताळणीत सहायक कार्यक्रम अधिकारी संदीप झाडोकार यांनी ६ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे, तर तांत्रिक सहाय्यक शिरीष सदापुरे यांनीही या व्यवहारास प्रोत्साहन दिल्याचे एसीबीच्या तपासात निष्पन्न झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

### यानंतर १४ जुलै रोजी तेल्हारा येथील आर.

» के. बार गार्डन अँड रेस्टॉरंट येथे सापळा रचण्यात आला. त्यावेळी संदीप झाडोकार यांनी तक्रारदाराकडून ६ हजार रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले. त्यानंतर दोन्ही संशयितांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणातील कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस उपअधीक्षक मिलिंदकुमार बहाकर यांच्या पर्यवेक्षणाखाली पोलीस निरीक्षक प्रवीण वेरूळकर आणि त्यांच्या पथकाने केली.

# एचडीएफसी अर्गो हेल्थ पॉलीसीच्या नावाने ऑनलाईन फसवणूक, तीन कॉल सेंटरचा पर्दाफाश

प्रतिनिधी १५ जुलै

**मुंबई :** २२/०६/२०२६ रोजी तक्रारकर्त्यांने फिर्याद दिली की, त्यांना एचडीएफसी इर्गो हेल्थ पॉलीसी ऑफीसमधून बोलत असल्याचे भासवून त्यांचे पॉलीसवरील १,५३,८२५ रू चा नो क्लेम बोनस चा फायदा मिळविण्यासाठी प्रोसेस करावी लागेल असे खोटे बोलून फिर्यादी यांचे केडीट कार्ड ची डिटेल्स विचारून घेत वेगवेगळे कारणे देत त्यांचे क्रेडीट कार्डवरून एकूण ३,४३,७००/- रू ची ऑनलाईन फसवणूक केलेबाबत दिलेल्या तक्रारीवरून गोवंडी पोलीस स्टेशनला गु. रजि. नं. ४८९/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४), ३१९ (२) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (सी), ६६ (डी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादीनी दिलेल्या फिर्यादीवरून गोवंडी पोलीस स्टेशनचे सायबर पथकाने तांत्रीक विष्लेषण करून मिळालेल्या माहितीच्या आधारे एम. के. रिकूटमेंट मॅन पॉवर, गाळा क जी-८४, कोहीनूर सिटी मॉल, कुर्ला पश्चिम या ठिकाणी असे बनावट कॉल सेंटर चालविले जात असल्यबाबत निष्पण्ण झाल्याने पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला. सदर ठिकाणी बनावट कॉल सेंटर चालविण्यासाठी लागणारे कॉम्प्युटर, लॅपटॉप, राउटर, मोबाईल फोन, वेगवेगळया कंपनीचे सिमकार्ड, तसेच ग्राहकांना कसे बोलून क्रेडीट कार्डची माहिती देण्यास प्रवृत्त करायचे याची स्क्रिप्ट व हे काम करणारे एकूण ०६ आरोपीतांना ताब्यात घेतले. फसवणूक केलेल्या ग्राहकांच्या क्रेडीट कार्डवरून सोन्याचे सिक्के व वस्तू ऑनलाईन खरेदी करून पार्सल




मागविले जात असे. पोलीस उपायुक्त पुर्व परिमंडळ ०१ यांचे मार्गदर्शनानुसार वरील आरोपीतांना पोलीस कस्टडीत त्यांचेकडे सखोल व कौशल्यपूर्ण केलेल्या तपासा दरम्यान एचडीएफसी कंपनीच्या हेल्थ इन्शुरन्स घेतलेल्या ग्राहकांची फसवणूक करण्यासाठी लागणारा हेल्थ इन्शुरन्स कंपणीचा डाटा, सिमकार्ड पुरविणारे तीन आरोपीतांना ताब्यात घेवून त्यांना सखोल व कौशल्यर्पूवक विचारपूस केली असता त्यांनी दिलेल्या माहितीवरून आणखी ०२ कॉल सेंटर साई लिलावती निवास गाळा, असल्फा व्हिलेज आणि कोहीनूर मॉल गाळा नं जी २२ या ठिकाणी त्या ठिकाणी गोवडी पोलीस स्टेशनच्या पथकाने छापा टाकून कॉल सेंटरचा सेट अप व आरोपीतांना ताब्यात घेतले. असे एकूण १२ आरोपी अटक करून त्यांचेकडून एकूण २९ कॉप्यूटर, ०७५ लॅपटॉप, १५ मोबाईल, ०३ राउटर, १५ सिमकार्ड व फसवणूक करण्यासाठी लागणारी स्क्रिप्ट, ऑनलाईन खरेदी केलेले २८.०५ ग्रॅम सोने असे एकूण १७,१८,२००/- रू चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला

**♦ १२ आरोपी व १७ लाखाचा मुद्देमाल हस्तगत**

आहे. आरोपीतांनी आशा प्रकारे परराज्यातील इन्शुरन्स ग्राहकांची सूध्दा फसवणूक केलेली असल्याचे निष्पण झाले असून अधिकची चौकशी चालू असुन अजुन आरोपी निष्पन्न होण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई देवेन भारती, सह पोलीस आयुक्त मनोजकुमार शर्मा, पूर्व प्रादेशिक अपर पोलीस आयुक्त धनंजय कुलकर्णी, पोलीस उपायुक्त पूर्व परिमंडळ ०१ समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त रामराव ढिकळे चेंबुर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली गोंवडी पोलीस स्टेशनचे वपोनि पंढरीनाथ सावंत, पोलीस निरीक्षक हणमंत क्षिरसागर, दयानंद जाधव, उप निरीक्षक अजय गोल्हार, अजित कंक, राहूल करंकाळ, माळवे पो.ह. प्रकाश नागे, शंकर पवार, दशरथ राणे, संभाजी लोहेटे, पो.ह. विजय चव्हाण, पो.ह. सतीश साळुंखे, पो. शि. अरविंद माळवे, निलेश भोर, समीर रेवाळे, महेश बोडरे, सोमनाथ आठरे, मपोशि कल्याणी पाफळे या पथकाने केली. मुंबई पोलीसांनी नागरिकांना अवाहन केले की, कोणत्याही अज्ञात व्यक्तीने इन्शुरन्स हेल्थ कंपनीमधून बोलत असल्याचे सांगून घेतलेली इन्शुरन्स पॉलीसी बंद करण्याची अगर त्यावरील परतावा मिळवून देण्याचे अमिष दाखवून आपली बँक डिटेल्स, कार्ड डिटेलस, ओटीपी मागितल्यास तो देवू नये. आशा प्रकारच्या सायबर फसवणूकीची शंका आल्यास तात्काळ शासकीय हेल्प लाईन १९३० वर कॉल करावा व त्वरीत जवळच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधावा.

# जयंतरावांची मुख्यमंत्र्यासोबत बैठक, पवारांची राष्ट्रवादी सत्तेत जाणार? सुप्रिया सुळेंकडून एक घाव दोन तुकडे

प्रतिनिधी १५ जुलै



**मुंबई.** राष्ट्रवादी काँग्रेस विषयी चर्चा संदर्भात सुप्रिया सुळे म्हणाल्या की, 'आमच्या पक्षाबाबत आज विविध प्रसारमाध्यमांमध्ये सूत्रांच्या हवाल्याने काही बातम्या आल्या आहेत. मात्र पक्षाकडून कोणीही अधिकृतपणे भूमिका मांडलेली नाही. या बातम्यांमुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाबाबत आमच्या सहकाऱ्यांमध्ये, कार्यकर्त्यांमध्ये समज-गैरसमज निर्माण होऊ शकतो, यासाठी मी ही पत्रकार परिषद घेत आहे. इथं येण्याआधी मी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत, काँग्रेस अध्यक्षांसह काँग्रेसचे नेते बंटी पाटील यांच्याशीही चर्चा केली आहे. तसंच आमच्या पक्षाच्या आमदार-खासदारांसोबतही चर्चा केली आहे. एनडीएमध्ये सहभागी होण्याबाबत आमच्या पक्षाच्या कोणत्याही नेत्याने, खासदाराने किंवा आमदाराने भूमिका मांडलेली नसताना सूत्रांच्या हवाल्याने बातम्या दिल्या जात आहेत. आमच्या पक्षाकडे ईडी, सीबीआय किंवा आयकर विभाग यासारख्या गोष्टी नसल्यामुळे आमच्या पक्षाची बदनामी केली जात आहे,' असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी सत्तेत सहभागी होण्याच्या चर्चा फेटाळून लावल्या आहेत.

**जयंत पाटील मुख्यमंत्र्यांना का भेटले?**

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष सत्तेत सहभागी होणार असल्यानेच अर्थमंत्रिपदाबाबत चर्चा करण्यासाठी काल जयंत पाटील यांनी मुख्यमंत्यांची भेट घेतल्याची चर्चा रंगत होती. यावरही सुप्रिया सुळे यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. 'जयंत पाटील हे अधिकृतपणे मुख्यमंत्यांची वेळ घेऊन त्यांना भेटले आहेत. ते कुठेही हुडी वगैरे घालून भेटायला गेले नव्हते. ते पुढच्या दाराने मुख्यमंत्र्यांना भेटले आणि पुढच्या दारानेच बाहेर पडले. ईश्वरपूर तालुक्यातील नगराध्यक्षांवर अचानक अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे. त्याबाबत चर्चा करण्यासाठी जयंत पाटील हे मुख्यमंत्र्यांना भेटले आहेत. या भेटीवेळी तिथं सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे दोघे होते की नाही, याची मला कल्पना नाही. त्याबाबत तुम्ही मुख्यमंत्र्यांनाच विचारलं पाहिजे,' असं मत सुळे यांनी व्यक्त केलं आहे. केंद्र सरकार आणू पाहात असलेलया मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष पाठिंबा देणार असल्याचं बोललं जात आहे. यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, 'याआधी सरकारने जे बिल आणलं होतं, ते आम्हाला मान्य नव्हतं. त्यामुळे आम्ही त्या बिलाविरोधात भूमिका घेतली आणि या बिलात काही दुरुस्त्या करून तो प्रस्ताव आम्हाला पुन्हा पाठवा, असं आम्ही सरकारला सुचवलं होतं. मात्र हा नवा प्रस्ताव अद्याप आमच्यासमोर आलेला नाही.

# पत्नीचा क्रूरपणा, पतीचा खून करून मृतदेहाचे केले ३ तुकडे

**११ महिन्यांनी पोलिसांना यश..**

प्रतिनिधी १५ जुलै

**मुंबई :** नवी मुंबईतील राबळे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक भीषण घटना समोर आली आहे, ज्यामुळे दिल्लीतील कुप्रसिद्ध श्रद्धा वाळकर हत्याकांडाच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत.

राबळे एमआयडीसी पोलिसांनी सुमारे ११ महिन्यांपूर्वी घडलेल्या या खळबळजनक हत्येचा छडा लावला असून, मृत बळीराम सूर्यनाथ कुशवाहा (५०) यांची पत्नी सुनीता कुशवाहा (४०) आणि तिचा कथित प्रियकर राहुल दशरथ प्रजापती (३०) यांना अटक केली आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या अनैतिक संबंधात अडथळा ठरलेल्या बळीरामचा या दोघांनी गळा दाबून खून केला आणि त्याची ओळख लपवण्यासाठी त्याच्या शरीराचे तीन तुकडे करून ते जंगलातील वेगवेगळ्या ठिकाणी फेकून दिले. न्यायालयाने दोन्ही आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, २४ एप्रिल २०२६ रोजी राबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात व्यक्ती हरवल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर तपास सुरू झाला. पोलिसांच्या तपासात असे उघड झाले की, ९ ऑगस्ट २०२५ च्या रात्री घडलेल्या घटनेपूर्वी त्या दांपत्याच्या दोन मुलांना त्यांच्या मावशीच्या घरी पाठवण्यात आले होते. त्यानंतर झोपलेल्या बलीरामचा गळा दाबून खून करण्यात आला आणि धारदार शस्त्राने त्याचे शीर धडापासून वेगळे करण्यात आले.

**संपूर्ण कहाणी काय आहे?**

नवी मुंबई झोन १ चे पोलीस उपायुक्त यांच्या माहितीनुसार, ऐरोलीच्या यादव नगर येथील रहिवासी असलेले ५० वर्षीय बलीराम सूर्यनाथ कुशवाहा हे त्यांची पत्नी सुनीता कुशवाहा आणि दोन मुलांसोबत राहत होते. याच काळात सुनीताचे घणसोली येथील ऑटो-रिक्षा चालक राहुल दशरथ प्रजापतीसोबत प्रेमसंबंध जुळले. जेव्हा बलीरामला हे कळले, तेव्हा त्याने याला विरोध केला. त्यानंतर त्या दोघांनी बलीरामला संपवण्याचा कट रचला.

# नोंदणीकृत बांधकाम कामगारांना सुधारित कल्याणकारी योजना लागू - कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

प्रतिनिधी १५ जुलै

**मुंबई:** राज्य शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्यावतीने राज्यातील लाखो नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. कामगारांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे, त्यांच्या सामाजिक सुरक्षेला प्राधान्य देणे आणि त्यांच्या कुटुंबातील पुढील पिढीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे या उद्देशाने मंडळाच्या ४ प्रमुख कल्याणकारी योजनांमध्ये सामाजिक सुरक्षा संहिता २०२० नुसार महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. सुधारित तरतुदींनुसार कामगारांना मिळणाऱ्या लाभ रकमेत वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी दिली आहे.

नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाला, तर त्याच्या कुटुंबाला आधार म्हणून दिली जाणारी एकवेळची आर्थिक मदतीची रक्कम आता ३ लाख ५० हजार रुपये करण्यात आली आहे. कामगाराचा अपघाती दुर्दैवी मृत्यू झाल्यास, त्याच्या कुटुंबाची आर्थिक वाताहत रोखण्यासाठी अपघाती मृत्यू सहाय्य म्हणून एकवेळ तब्बल ६ लाख ५० हजार रुपयांचे भरीव आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. याशिवाय, जर एखाद्या कामगाराला अपघातामुळे किंवा अन्य कारणांमुळे कायमचे अपंगत्व आल्यास एकवेळचे दिव्यांग सहाय्य म्हणून २ लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे.

**निवृत्तीवेतन योजनेचा लाभ**

बांधकाम कामगारांच्या वृद्धत्वाचा काळ सुकर व्हावा, यासाठी मंडळाकडे नोंदणीकृत कामगारांकरिता निवृत्तीवेतन योजनेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. वयाची ६० वर्षे पूर्ण केलेल्या व मंडळाकडे सलग किमान १० वर्षे पूर्ण नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ कामगारांच्या मंडळाकडील एकूण नोंदणी कालावधीशी जोडण्यात आला आहे. त्यानुसार, ज्या कामगारांचा नोंदणी कालावधी झाला आहे, त्यांना ५० टक्क्यांच्या मर्यादेत म्हणजेच प्रतिवर्ष ६ हजार रुपये निवृत्तीवेतन दिले जाईल. ज्या कामगारांची नोंदणी एकूण १५ वर्षे पूर्ण झाली आहे, त्यांना ७५ टक्क्यांच्या मर्यादेत म्हणजेच प्रतिवर्ष ९ हजार रुपये मिळतील, तर ज्या कामगारांचा नोंदणी कालावधी एकूण २० वर्षे पूर्ण झाला आहे, अशा कामगारांना प्रतिवर्ष पूर्ण १२ हजार रुपये निवृत्तीवेतन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहे कामगारांच्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आणि त्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली करून देण्यासाठी शैक्षणिक सहाय्य योजनेची पुनर्रचना करण्यात आली आहे. हे शैक्षणिक अर्थसहाय्य बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्यांकरिता मर्यादित असेल. प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावर इयत्ता ९ वी उत्तीर्ण पाल्यास प्रति पाल्य २० हजार रुपये आणि इयत्ता ११ वी उत्तीर्ण झालेल्या पाल्यास पुढील शिक्षणासाठी २५ हजार रुपये इतके अर्थसहाय्य दिले जाईल.

**बांधकाम कामगाराच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी भरीव मदत**

उच्च शिक्षणामध्ये वैद्यकीय पदवीचे शिक्षण घेणाऱ्या कामगारांच्या पाल्यास प्रति पाल्य १ लाख रुपये आणि अभियांत्रिकी पदवीचे शिक्षण घेणाऱ्या पाल्यास प्रति पाल्य ६० हजार रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात येणार आहे. सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष तरतूद करण्यात आली असून, केंद्रीय संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पाल्यांच्या दरवर्षीच्या पूर्ण अभ्यासक्रम शुल्काची प्रतिपूर्ती शासन करेल. तसेच इतर शासन मान्यताप्राप्त अनुदानित व विना-अनुदानित सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या पाल्यांना प्रतिवर्ष १० हजार रुपयांचे सहाय्य दिले जाईल. या योजनेचा विस्तार आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात आला असून, जे पाल्य परदेशात जाऊन पदव्युत्तर पदवी किंवा पी.एच.डी. सारखे उच्च शिक्षण घेत आहेत, त्यांच्या अभ्यासक्रम शुल्काची संपूर्ण रक्कम शासन थेट संबंधित परदेशी विद्यापीठाकडे वर्ग करणार आहे. तसेच केंद्र शासनाच्या धोरणानुसार संबंधित विद्यार्थ्यास अनुषंगिक भत्ते, प्रवास भत्ता, विमा अदा करण्यात येणार आहे. यासोबतच, शालेय शिक्षणाची पायाभरणी भक्कम व्हावी म्हणून इयत्ता १ ली ते ८ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या पहिल्या दोन पाल्यांना शैक्षणिक साहित्याने युक्त असलेला एक 'मूलभूत वस्तू संच' मोफत वाटप करण्यात येणार आहे.

**महिला बांधकाम कामगारांना प्रसूती सहाय्य योजना**

महिला बांधकाम कामगारांचे आरोग्य आणि बाळाच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने प्रसुती सहाय्य योजना लागू करण्यात आली आहे. मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या महिला बांधकाम कामगारांची नैसर्गिक पद्धतीने किंवा शस्त्रक्रियेद्वारे प्रसुती झाल्यास, तिला बाळंतपणाच्या काळात सकस आहार, औषधोपचाराचा खर्च भागवण्यासाठी एकवेळ २५ हजार रुपये एवढे अर्थसहाय्य मंजूर केले जाणार आहे. ही योजना पहिल्या दोन अपत्यांसाठी लागू असणार आहे. कल्याणकारी योजनांमध्ये झालेल्या सुधारणांमुळे राज्यातील लाखो बांधकाम कामगार कुटुंबांना खूप मोठा सामाजिक आणि आर्थिक दिलासा मिळणार आहे, असेही कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी सांगितले.

# मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांमध्ये दीडशे दिवसांचाच पाणीसाठा

प्रतिनिधी १५ जुलै



**मुंबई:** मुंबईसह धरण क्षेत्रात पावसाने काही दिवसांपासून विश्रांती घेतल्याने शहराच्या पाणीसाठ्याबाबत चिंता वाढली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांमध्ये रविवारीपर्यंत एकूण ५० टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, हा साठा सुमारे १५० दिवस पुरेल इतकाच आहे. त्यामुळे पाऊस लांबल्यास पाणीसाठ्यावर ताण येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुंबईला अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सात धरणांतून पाणीपुरवठा केला जातो. यापैकी मुंबई महापालिका क्षेत्रातील विहार तलाव ७ जुलै रोजी रात्री ९ वाजता पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागला. गेल्या वर्षी हा तलाव १८ ऑगस्ट रोजी भरला होता. विहारची पाणीसाठवण क्षमता २७,६९८ दशलक्ष लिटर आहे. त्याच दिवशी तुळशी धरणही १०० टक्के भरून वाहू लागले. सातही धरणांची एकूण पाणीसाठवणक्षमता १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर असून, सध्या त्यामध्ये सात लाख २१ हजार ३५४ दशलक्ष लिटर म्हणजेच ५० टक्के पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा ७४ टक्के होता. मात्र, गेल्या तीन-चार दिवसांपासून मुंबई आणि धरणक्षेत्रात पावसाने उघडीप दिल्याने पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ झालेली नाही. शनिवारी सातही धरण क्षेत्रांत शून्य मिलिमीटर पावसाची नोंद झाली, तर रविवारीही समाधानकारक पाऊस झाला नाही. महापालिकेच्या गणनेनुसार, धरणांतील प्रत्येक एक टक्का पाणीसाठा साधारण तीन दिवस पुरतो. त्या दृष्टीने सध्याचा ५० टक्के साठा सुमारे १५० दिवसांसाठी पुरेसा आहे. मात्र, पावसात आणखी खंड पडल्यास साठ्यात घट होण्याची शक्यता असून नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करणे आवश्यक आहे.

**पुण्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस घटला**

शहरात गेल्या आठवड्यात जोरदार बरसलेल्या पावसाने चार दिवसांपासून विश्रांती घेतली आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्येही पावसाचा जोर ओसरला असून, अधूनमधून हलक्या सरी बरसत आहेत. घाटमाथ्यावर मध्यम स्वरूपाचा पाऊस पडतो आहे. शहरात रविवारी दिवसभर ऊन आणि ढगाळ वातावरणाचा खेळ सुरू होता. तापमानातही थोडी वाढ होऊन दिवसभरात कमाल ३०.५ आणि किमान २३.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पुढील चार दिवस शहरात दुपारनंतर आकाश मुख्यतः ढगाळ राहणार असल्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केली आहे. 'एल निनो'च्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहिले असून, पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात १२ जुलैपर्यंत गतवर्षीच्या तुलनेत कमी पावसाची नोंद झाली आहे. मात्र, जिल्ह्यातील पवना, मुळशी; तसेच काही पूर्व भागांत गतवर्षीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. जून महिना जवळपास कोरडा गेल्यानंतर जुलैच्या पहिल्याच आठवड्यात दमदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे जूनअखेरीस केवळ १२ टक्क्यांवर आलेला खडकवासला प्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने वाढला. सध्या खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांमध्ये एकूण १६.८० अब्ज घनफूट (टीएमसी) म्हणजेच ५७.६३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. या कालावधीत झालेल्या मुसळधार पावसामुळे सुमारे दीड टीएमसी पाण्याचा विसर्ग करावा लागला. आतापर्यंत झालेल्या पावसाची तुलना करता खडकवासला धरणात ४१९ मिमी पावसाची नोंद झाली असून, गेल्या वर्षी ३९० मिमी पावसाची नोंद होती. मात्र, टेमघर, पानशेत आणि वरसगाव या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात गतवर्षीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. दुसरीकडे, पवना धरण परिसरात यंदा १,४८५ मिमी, तर मुळशी परिसरात २,७०३ मिमी पाऊस झाला असून, दोन्ही ठिकाणी गतवर्षीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

# ठाण्यातील सर्व अनधिकृत होर्डिंग्स तत्काळ हटवा : शिंदे

प्रतिनिधी १५ जुलै

**मुंबई :** ठाण्यात काल घडलेल्या दुर्दैवी होर्डिंग दुर्घटनेची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी तात्काळ ठाणे महानगरपालिका आयुक्तांना फोन करून शहरातील सर्व अनधिकृत होर्डिंग्स तातडीने निष्कासित करण्याचे आदेश दिले आहेत. यासोबतच पावसाळ्यात वाऱ्या-पावासामुळे पुन्हा अशी कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी शहरातील सर्व मोठ्या होर्डिंग्सचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे कडक निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. धोकादायक ठरणाऱ्या होर्डिंग्सवर आणि बेकायदेशीर फलक लावणाऱ्या दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असे त्यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्र्यांच्या या आदेशानंतर पालिका प्रशासन एक्शन मोडमध्ये आले असून काल रात्रीपासूनच शहरात कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

# मुंबईच्या कोस्टल रोड बोगद्यात धावत्या गाडीला आग लागली!

प्रतिनिधी १५ जुलै



**मुंबई :** बुधवारी दुपारी मुंबईच्या कोस्टल रोड बोगद्यात एका धावत्या गाडीला अचानक आग लागली. ही घटना हाजी अली ते वरळीकडे जाणाऱ्या गल्लीत घडली. अग्निशमन दल, पोलीस आणि रुग्णवाहिका तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या.

प्राथमिक माहितीनुसार, आज दुपारी सुमारे १२:२५ वाजता मुंबई अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाला कोस्टल रोड बोगद्यातील हाजी अली ते वरळीकडे जाणाऱ्या गल्लीत एका धावत्या गाडीला अचानक आग लागल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच, मुंबई अग्निशमन दल, मुंबई पोलीस आणि १०८ रुग्णवाहिकेची पथके घटनास्थळी दाखल झाली आणि त्यांनी बचाव व मदतकार्य सुरू केले.

सध्या, या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आगीचे कारण अद्याप समजलेले नाही. संबंधित यंत्रणा या प्रकरणाचा तपास करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र - ४०००२२. येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** - 0724 - 2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A3072, RRC Helpline No. 8484842135